# श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ,

१, ना. ठा. मार्ग, न्यु मरिन लाईन्स्, चर्चगेट, मुंबई - २०.

**विशेष कक्ष**


जा.क्र. विशेष कक्ष/अ-३९/२०२३-२४/४४. दि. ३०.०९.२०२३

## परिपत्रक

प्रती,
मा. प्राचार्य/विभाग प्रमुख/प्रभारी/संचालक,
विद्यापीठ संचलित महाविद्यालये/विभाग/सेंटर/इंस्टिटयूट, चर्चगेट, जुहू, पुणे व श्रीवर्धन कॅम्पस्,
तसेच विद्यापीठ संलग्न महाविद्यालये/नोंदणीकृत संस्था, महाराष्ट्र राज्य,
श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ, मुंबई

विषय :- अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित असली तरीही विद्यार्थ्यांची कोणतीही कागदपत्रे अडवून न ठेवण्याबाबत...

संदर्भ :- १. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय शासन निर्णय क्र. देशियो २०२३/प्र.क्र. ३२०/शिक्षण-१, दि. ०६ सप्टेंबर, २०२३

२. मा. प्रसाद खैरनार, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर, चेंबूर यांचे पत्र क्र. सआसक/मुंउ/ भासशि/२३-२४/२३३४,

महोदय/महोदया,

कृपया सोबत जोडलेले उपरोक्त विषयांकित संदर्भीय शासन निर्णय आणि शासन पत्र पाहावे.

संदर्भाधिन शासन निर्णय/शासन पत्रानुसार, अनुसूचित जाती या प्रवर्गातील विद्यार्थ्यांची त्या त्या शैक्षणिक वर्षातील किंवा तत्पूर्वीची शैक्षणिक संस्थांना देय असलेली शिष्यवृत्ती शासनाकडून अप्राप्त आहे. या सबबीखाली कोणत्याही विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येऊ नयेत. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे सर्व दाखले, प्रमाणपत्र व अनुज्ञेय आवश्यक दस्तऐवज त्वरीत उपलब्ध करून देण्यात यावेत. सदर देय रक्कम महाविद्यालयास शासनातर्फे देय असून ती भविष्यात उशीरा का होईना उपलब्ध होणार असल्याने सदर रक्कम प्रलंबित असली तरी महाविद्यालयांना विद्यार्थ्यांची कागदपत्रे रोखून ठेवता येणार नाहीत, अशा स्पष्ट सूचना शासनाकडून निर्गमित करण्यात आल्या आहेत, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने असे निर्देश देण्यात येत आहेत की, संदर्भाधिन शासन निर्णय व शासन पत्रातील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

कळावे.

आपला,

(डॉ. विलास नांदवडेकर)
कुलसचिव

SNDT WOMEN'S UNIVERSITY
1, Nathibhai Thackersey Road Mumbai-400020
Special Cell
Inward No 294 Aruna 25/9/23
Date 25/9/2023
File No. A-39



# सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर.

नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, आर.सी.चेंबुरकर मार्ग, चेंबुर, मुंबई – ४०००७१.
दुरध्वनी क्र. ०२२-२५२२२०२३. ईमेल -acswomumbaisub@gmail.com

जा.क्र.सआसक/मुंउ/भासशि/ २०२३-२४/ 2338 दिनांक 08/09/2023

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,
अधिष्ठाता/संचालक/प्राचार्य/रजिस्ट्रार,
सर्व महाविदयालये,
मुंबई उपनगरे.

**विषय:- अनुसूचित जाती प्रवर्गातील विदयार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित असली तरीही विदयार्थ्यांची कोणतीही कागदपत्रे अडवून न ठेवण्याबाबत.**

**संदर्भ- सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग शासन परिपत्रक क्र.देशियो २०२३/प्र.क्र.३२०/शिक्षण-१, दिनांक ६ सप्टेंबर २०२३.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये, सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र शासनाच्या सर्व प्रकाराच्या शिष्यवृत्तीसाठी महाडीबीटी (Mahadbt) पोर्टल दिनांक ०१.१०.२०१८ पासून नव्याने कार्यान्वीत झाले असून https://mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळाचा वापर करुन अनुसूचित जाती प्रवर्गातील विदयार्थ्यांकरीता सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविधी शिष्यवृत्ती/फ्रिशीप योजनांकरीता विदयार्थ्यांनी आपले ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत करण्यात येतात. तद्नंतर पात्र लाभार्थ्यांना शिष्यवृत्ती/फ्रिशीप रक्कमेची सत्र निहाय (First and Second Installment) अदायगी करण्यात येते.

केंद्र शासनाच्या सुधारीत निधी वाटपाच्या निर्णयानुसार शासनस्तरावर उध्दवलेल्या न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने तसचे काही तांत्रिक कारणास्तव सन २०२१-२२ व २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाची काही विदयार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्यास विलंब होत आहे व याच कारणास्तव काही महाविदयालये विदयार्थ्यांची कागदपत्रे रोखून धरत असल्याच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिय शासन परिपत्रकान्वये शिष्यवृत्तीची देय रक्कम महाविदयालयास शासनातर्फे देय असून ती भविष्यात उशीरा का होईना उपलब्ध होणार असल्याने सदर रक्कम प्रलंबित असली तरी महाविदयालयांना विदयार्थ्यांची कागदपत्रे रोखून ठेवता येणार नाहीत असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तरी मुंबई उपनगर अधिनस्त सर्व महाविदयालयांनी शिष्यवृत्ती प्रलंबित आहे या सबबी खाली अनु. जाती प्रवर्गातील विदयार्थ्यांची कागदपत्राची अडवणूक करु नये.

(प्रसाद खैरनार)
**सहायक आयुक्त, समाज कल्याण,**
**मुंबई उपनगर.**

Spl. cell ... खुलासा सादर करावा ... 27/9.

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित असली तरीही विद्यार्थ्यांची कोणतीही कागदपत्रे अडवून न ठेवण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक: देशियो २०२३/प्र.क्र. ३२०/शिक्षण-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मुंबई-४०००३२.

दिनांक : ६ सप्टेंबर, २०२३.

संदर्भ :-

१.आयुक्त, समाजकल्याण यांचे पत्र क्र.सकआ/शिक्षण/महाडीबीटी पोर्टल.२०१९-२०/ शिष्यवृत्ती / २०२१/८६५, दिनांक २०.८.२०२०

२.आयुक्त, समाजकल्याण यांचे पत्र क्र.सकआ/शिक्षण/भासशी/का-४ब/नस्ती क्र.८०४/२०२०-२१/१५४१२, दिनांक १४.१०.२०२०

३.आयुक्त, समाजकल्याण यांचे पत्र क्र.सकआ/शिक्षण/भासशी/का-४ब/२०२१-२२/६१२, दिनांक २७.४.२०२१

**शासन परिपत्रक:-**

सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसुचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध प्रि मॅट्रीक, पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात.

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, मॅट्रिकोत्तर शिक्षण फी परिक्षा फी प्रतीपुर्ती , राजर्षी शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती व व्यवसायिक अभ्यासक्रमात शिकणाऱ्या अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना या योजनेची रक्कम PFMS प्रणालीद्वारे (Online)आधार सलंग्न बँक खात्यात वितरीत करण्यात येते.

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र शासनाच्या सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीसाठी महाडीबीटी (Mahadbt) पोर्टल दि. ०१.१०.२०१८ पासून नव्याने कार्यान्वीत झाले असून https://mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळाचा वापर करून अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती/ फ्रिशिप योजनांकरिता विद्यार्थ्यांनी आपले ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत करण्यात येतात. तदनंतर पात्र लाभार्थ्यांना शिष्यवृत्ती / फ्रिशीप रक्कमेची सत्र निहाय (First and Second Installment) अदायगी करण्यात येते.

कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर आयुक्त, समाजकल्याण, पुणे दिनांक २०.०८.२०२०, दिनांक १४.१०.२०२२ व दिनांक २७.४.२०२१ च्या पत्रान्वये तसेच शासनामार्फत वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील मॅट्रिकोत्तर शिक्षण देणाऱ्या सर्व शैक्षणिक संस्थांना आदेशित करण्यात आले होते की, अनुसूचित जाती या प्रवर्गातील विद्यार्थ्यांची त्या त्या शैक्षणिक वर्षातील किंवा तत्पूर्वीची शैक्षणिक संस्थांना देय असलेली शिष्यवृत्ती शासनाकडून अप्राप्त आहे, या सबबीखाली कोणत्याही विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येऊ नयेत

त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे सर्व दाखले, प्रमाणपत्र व अनुज्ञेय आवश्यक दस्ताऐवज त्वरीत उपलब्ध करुन देण्यात यावेत.

आता केंद्र शासनाच्या सुधारीत निधी वाटपाच्या निर्णयानुसार शासनस्तरावर उद्भवलेल्या न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने तसेच काही तांत्रीक कारणास्तव सन २०२१-२२ व २०२२-२३ या शैक्षणिक वर्षांची काही विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्यास विलंब होत आहे व याच कारणास्तव राज्यातील काही महाविद्यालये विद्यार्थ्यांची कागदपत्रे रोखून धरत असल्याच्या तक्रारी आयुक्तालय तसेच शासनास प्राप्त होत आहेत. त्याचबरोबर याबाबत वृत्तपत्रात बातम्यादेखील प्रसिध्द झालेल्या आहेत.

सदर देय रक्कम महाविद्यालयास शासनातर्फे देय असून ती भविष्यात उशीरा का होईना उपलब्ध होणार असल्याने सदर रक्कम प्रलंबित असली तरी महाविद्यालयांना विद्यार्थ्यांची कागदपत्रे रोखून ठेवता येणार नाही, अशा स्पष्ट सूचना शासन स्तरावरुन कोवीडच्या पार्श्वभुमीवर देण्यात आल्या होत्या. तशाच सूचना सर्व प्रादेशिक उपायुक्त/ उपसंचालक तसेच सर्व सहाय्यक आयुक्त/ संचालक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व महाविद्यालयांना यासंदर्भात सूचित करावे व कोणत्याही विद्यार्थ्यांची कागदपत्रे महाविद्यालयास रोखून ठेवता येणार नाहीत याबाबत महाविद्यालयांना निर्देश देण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रशान्त वाघ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. सचिव, सामाजीक न्याय विभाग यांचे स्वीय सहायक
२. प्रादेशिक उपायुक्त (सर्व), समाजकल्याण
३. सहायक आयुक्त (सर्व), समाजकल्याण
४. निवडनस्ती (शिक्षण)